

# शावड्या

साईनाथ चन्ने

ई साहित्य प्रतिष्ठान प्रस्तुती

# शावड्या

## लेखक...

## साईनाथ चन्ने

# शावड्या

साईनाथ चन्ने
मु. पो. सवंदगाव
ता. वैजापुर जि. औरंगाबाद
पिन.. . ४२३७०३
मो. नं. ९४२०३०१३०९
मेल... sainathchanne@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य किंवा चित्रपट रुपांतर करण्यापुर्वी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

संपादक : अनघा हिरे

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान -

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन :- १ एप्रिल २०१७

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता

हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

***मनोगत..***



आदरणीय वाचक मित्रहो,

मी तसा कवी वा लेखक नाहीच, 7 जुले 2015 रोजी मी जळगाव जिल्ह्यात सहस्रलिंगता या आदिवासी पाड्यावरील मराठी शाळेत रुजु झालो तेथील वातावरण व जीवनमान बघुन मन हळहळले अन नकळतच चार शब्द कागदावर उमटले अन त्यांना ई. साहित्य प्रतिष्ठानने आपणा पर्यंत पोहचवले, माझ्यातला कवी गुण बाहेर आणणा-या त्या विद्यार्थ्यांचा मी ऋणी आहे हे लहान संसाहित्यपुष्प आपणापुढे आणतांना मनस्वी आनंद होतो आहे.. .. . या कार्यात मला प्रोत्साहीत करणारी माझी पत्नी उषा व आमचे मुख्याध्यापक श्री अशोक महाजन सर व सर्व ई साहित्य टीम यांच्याही ऋणात राहतो आहे आपल्या सुचना व प्रतिक्रियांची वाट बघनारा सदैव आपलाच मित्र

श्री. साईनाथ चंद्रभान चन्ने (M. A. B. ed)

# अर्पणपत्रिका

माझे हे दुसरे पुस्तक पुष्प माझ्या करारी आजोबांच्या चरणी सस्नेह अर्पण...

**लेखक उवाच.. .. .. ..**

मित्रहो माझे  हे लिखाण काल्पनिक नसून सत्य व वास्तव जिवनातील अनुभवलेल्या प्रसंगावर आधारीत आहे, यात असलेला नायक शावड्याच्या जीवनातील  ही सत्यता आहे.. या सर्व प्रसंगाना तोंड देत आज शावड्या शिक्षक रुपाने समाज घडविण्याचे स्वप्न सजवित आहेत.. ..

ही संपुर्ण एकच गोष्ट आहे फक्त प्रसंगानुरुप तिला छोट्या छोट्या भागात विभागले आहे, अन्यथा ही एकच गोष्ट फक्त शावड्याची गोष्ट.. .. .

या कथेतील निलीमा व रामचंद्र्या हे दोन पात्रे  फक्त काल्पनिक आहेत, बाकी सर्व घटना, प्रसंग, ईतर पात्रे, स्थळे सर्वच्या सर्व वास्तव आहेत.. . ते सर्व लेखकाचे पारीवारीक मंडळी आहेत, त्यामुळे ईतर कोणाचाही याच्याशी कसलाही संबंध नाही, तरीही साधर्म्य असल्यास केवळ योगायोग समजावा.. .. ..

# अनुक्रमणिका


- शावड्या
- पप्पीचाअर्थ
- रामचंद्र्या
- शँपु
- पी. एस. आय. ची रेड
- शावड्या बनला शिक्षक

# शावड्या

शावड्या ए शावड्या आजोबांचा करारी अन घाम फ़ोडणारा आवाज ओसरीतून घुमला, अन मागच्या वाड्यात शेळीला गवत बांधनारा शावड्या चमकला हातातले काम टाकून हरणागत पळाला, चार खोल्या ओलांडून ओसरीत हजर झाला.

काय बाबा?

पाचची पुडी आण. दौलत आलाय बग

बर बाबा.........

तसा शावड्या गेला मधल्या अंधाऱ्या खोलीत भल्या मोठमोठ्या जुन्या मडक्याची उतरंड लावलेली त्याच्या मागे भिंतीला एक खातं, खात्याला मधेच एक चोरवाट, त्यात एक गाडगं बसवलेलं अन त्यात पाच दहा अन पन्नासच्या बांधलेल्या गांजाच्या पुड्या...

शावड्याने पुडी घेतली दौलतला दिली. . दौलत गेला.

तसा शावड्या फ़ार मोठा वाटला ना तुम्हाला? पण तो फ़क्त सहा वर्षाचा, नुकताच पहिलिला गेलेला, आजोळी राहायचा, वयाच्या सहा महिन्यापासून हे सगळं पाहत आलेला, हो! शावड्याच्या जन्माच्या वक्ताला त्याची आई भयंकर आजारी पडली. त्यात दुधही येईना अंगावर, पाच भावाच्या अन साठ एकराच्या बागाईतदाराच्या घरात लग्न झालेलं तिचं. पण नवरा मात्र येडा झालेला, मग काय भावडांनी वाळीत टाकलेला संसार तिचा, पदरी दोन मुलं. शावड्या दोन नंबरचा... ऩवरा रोज मारझोड करायचा, घरात आहे नाही ते विकायचा, विरोध केला तर शेतातले कांदे वांगे विकायचा... ऱोजचच त्याचं हे..

एकदा वैतागली देवाला लाखभर शीव्या घातल्या अन सरळ दोन्ही पोरं घेवून आली बापाकडे, ढसाढ्सा रडली अन दोन दिस राहून निघली पुन्हा सासरी नरक यातना भोगायला, बापाला येते म्हनली अन तसा म्हतारा खणकला,

बिबे, ते लहान कड्डु राहु दे इठ,

पण भाउ सहा महिन्याचंच हेते

हा माहिती ए माला तिकडंलय सोनं खावून रायलं ते .... च्यामारी घॊटभर दुध नाही भिकारचोटांकडं

बिबे एक वासरू आणखिन पाळलं म्हणन अन लेकाला सांभाळीन तुह्या. जाय अन पुन्हा वघुळ येउ देउ नको. बापाचं नाव निघिन आसंच वाग. मेलि तरी हरकत नाही बेटे.....

टाप नवती म्हताऱ्या पुढ कोणाची, बिबीनं आवंढा गिळला अनमाग न पाहता शावड्याला ठेवून निघुन गेली

पुन्हा ना दसरा ना दिवाळी. . आता शावड्या सहा वर्षाचा झाला होता तरी ती आली नव्हती, तिकडे तिसराही मुलगाच झाला होता तिला..... तसच त्या येड्या सोबत दिवस काढनं सुरु होतं

शावड्याला मात्र तिकडचं काही माहित नव्हतं मामा म्हणजे त्याचा बाप अन मामी म्हणजे त्याची आई अन गोरीपान पण बुटकी नथिवाली आज्जी अन करारी आवाजाचे आजोबा एवढंच त्याला आठवयचं

शावड्या, ए पोरा, आजोबाचा खोकलणारा आवाज अन खोकता खोकता धोतरात पादण्याचा आवाज त्याला ऐकु आला, हो चिलिमिचा ठसका लागल्यावर हवा कोणत्याही दारां बाहेर यायची....

ए पोरा आज मंगळवार आहे त्या मुन्त्याच्या घरी जाय अन त्यानं डोळा मारला तर वापस ये अन मान हलवली तर दिड किलो मटन घेवून ये लवकर जाय....

मुन्तुभाई मटनवाला पाठ कापलेली असली तर डोळा मारायचा अन बोकड कापला असला तर मान हलवायचा. .. ऩेहमीच गिर्हाईक म्हनुन हा ईशारा...

तसा शावड्यानं आपल्या पायाच्या ईम्पोर्टेड दुचाकिला किक मारलि अन हाईंग हाईंग करत मुन्तुच्या दुकानावर पार्क केली

मुन्तुने मान हलवली अन दिड किलो मटन शावड्यानं आणून मामीच्या हवाली केलं.

मामी तशी  शुद्ध शाकाहारी पण स्वयंपाकात एकदम सुगरन, तीनं पाट्यावर वाटुन केलेल्या मटनाचा वास साऱ्या गल्लीत दरवळायचा अन खाणाऱ्याच्या हाताचा वास तीन तीन दिवस नाही जायचा ....

सांज ढळली होती. धोतराच्या सोग्याच्या अंधाराला काचेचा एक पेला, पुढ्यात एक तांब्या अन उजव्या मांडीखाली एक संजीवनी बॉबीसंत्रा 180 मिली पडलेली, बीडी पेटता पेटता म्हतारा गरजला,

शावड्या पाह्य रे कुठवर आलं ते,

हा बाबा मसाला टाकला उकळी येउ राह्यली त्यानं मामीला ईचारुन उत्तर दिल.....

तसा म्हताऱ्यानं सोग्या खाली हात घातला बाटली काढून शावड्याला दिलि, शावड्याने न चुकता बुडाला दणका देउन सील मुरगळ्लं, पेला भरुन पाणी घातलं अन म्हणला घ्या बाबा.....

म्हतारा ग्लास घेत म्हणला, शावड्या जा उकळी आली आसन पोटभर जेव अन मामाला वडा खालुन बोलुन आण मी जरा बसतों,

अन ए कड्डा अभ्यास करा जरा, पारणे फ़ेडा माह्या पोरीचे, आलं का टाळक्यात....

हो बाबा

तसा शावड्या पोटभर जेवला, मामाला निरोप देउन आला. अन त्याने पुस्तक उचलले.

अभ्यास करता करता तो तिथंच चटईवर केव्हा लवंडला कळलंही नाही.

जाग आली ती आजोबांच्या आवाजानेच

शावड्या ए पोरा, आरे उठ पहाट झाली बेट्या, ढुंगणावर उन पडायची येळ झाली गड्या.......

तशी शावड्याला साखर झोपेतून जाग आली,, ,, गावरान गाईचे वाटीभर तुप घेउन आज्जी बोल्ली. .

घ्या गिळा अन पुस्तक बघा ... शिका अन वनवास संपवा माह्या बीबीचे... नकळतच आज्जिच्या गळ्यात आलेला आवंढा, शावड्याच्या अंगावर शहारा आणून गेला..

अन पाणवलेल्या डोळ्यानं त्याने रॉकेलची डीबरी (दिवा) जवळ घेतला अन वाचु लागला...

अ...अननसाचा अ

आ.. आईचा आ....

अन गंजाटी आज्जा माझा बीडीच्या धुरात अभ्यास घेऊ लागला..........................

# पप्पीचा अर्थ

शावड्या ए पोरा आरं उठकी आरं गर्दी पडली तर पासल्या पहार व्हईन लेका पाण्याला.. .

जाय त्या महाराणीलाबी उठीव घोरत पडली आस्सण वगारावाणी, सगळा धाक मेला माह्याच मड्याला.. .. .

म्हतारी जमिनीला हात टेकीत उठली स्वतःशिच बडबडत वाड्यात निगली हंडे घड्ड्या माठ भगुने बादल्या सारं गोळा करून हातात मावेल तेवढं घेवून निघली, अन शावड्यावर उगी खेकसली लवकर तरफडा नाहीतर नंबर लागता लागता तिन्ही सांज व्हायची. .. .

खरतर ती शावड्याला बोलत नव्हती. .. त्याला आडून मामीला बोलत व्हती..

मामाचा गाव छान पण पाण्याचा भारी ताण.. लोक रात्रबेरात्र करुन पाणी भरायचे आज्जीचं घड्याळ बरोबर अडीचला डोळे उघडायचं अन सुरु व्हायचं पाणी पुराण पाच वाजेस्तोर.. ..

म्हतारी कधी बाम्हणाच्या मळ्यात तर कधी रोठ्याच्या मळ्यात. .. तर कधी पीराच्या हापशावर तर कधी शाळेच्या नायतर वड्डयाच्या हापशावर सापडायची.. ..

हापशे गुळणीवर पाणीवर येईस्तोर उर फुटायचा अन भांडे भरेस्तोर जीव सुटतो वाटायचा.. . पण ईलाज नव्हता.. .. .

असा हा पाणी किस्सा. फार कंटाळवाणा वाटायचा शावड्याला.. .. .. .. .. . पण याला एक चंदेरी झालर पण होती.. निलीमाताई

वय वर्ष १३/१४ असावं. तीचं पातळ अंगकाठी, लांबसडक केस, सावळीशी लाघवीपोर. .. मामाच्या घरा शेजारुनच पाचसात घरं सोडून तीचं खोपटं.. . मजुरी करणारे आई बाप अन पाच दहा बकऱ्या हा तीचा परिवार.. ..

शावड्या तेव्हा दुसरीला..

आज्जी उठली की तीलाही आवाज द्यायची कारण ती शावड्याला सोबत राहायची पाणी वहायला.. . मामी अन तीची आई अन शावड्या अन ती अशा जोड्या. .. आज्जी नंबर लावून भांडे भरायची अन ती चारजण रिकामे करुन यायची.. ..

शावड्या मात्र निलीमाताई पासून लांब पळायचा, ती खुप लाड करायची सगळयांसमोर त्याला  खाउ पिउ घालायची, मांडीवर बसवून खेळवायची गोडगोड पापे घ्यायची सगळ्यांना फार आवडायची ती शावड्या व्यतिरीक्त.. .. .. .. कारण ती सर्वा समोर तर पापा घ्यायची पण पाणी भरताना अंधाऱ्या पांदीत अन रविवारी बकऱ्या चारतांना एकटी असतांना जेव्हा ती शावड्याला तीच्या छातीला मुरगाळुन जो पाप्याच्या रुपात जो जीव घेणा चावा घ्यायची त्यामुळे शावड्या भेदरुन जायचा.. . त्याला तीच्या त्या पप्पीचा अर्थ कधी कळलाच नाही. .. .. . तो तीला ताई म्हणत राहीला पण ती कधी ताई सारखी वागलीच नाही. .. .. ..

अन दुर्दैव शावड्याला कधी ते कळलंच नाही.. .. .. .. .. ..

निलीमाच्या त्या पप्पीचा अर्थ शावड्याला आत्ता कळला. .. .. . ती पप्पी नाही हव्यासी चुंबण होतं.. .. .. .. .

# रामचंद्र्या

मालक ओ मालक, सकाळच्या आठ वाजताच त्याची ही आरोळी कानात वळवळायची आता हा कोणी दुधवाला, पेपरवाला, किंवा भाजीवाला नव्हता.. .. .., अन मालक म्हणजे दुसरा तिसरा कोणी नाही आपला शावड्या.. . अन हा आरडणारा म्हणजे रामचंद्र्या बँकेत शिपाई होता.. ..

सकाळी प्रातःविधी उरकताच त्याची पावलं शावड्याला शोधत निघायची. .. हा रामचंद्र्या तिन्हीकाळ बिन चपलांचा, सफेद ड्रेस अन डोक्यावर गांधी टोपी अन दातात काडी घातलेला असायचा.. .

रामचंद्र्यला चार दिवस जेवण नसलं तरी चालायचं पण सकाळी चहा लागायचा, दुधाचा, बिनदुधाचा, साखरेचा, बिनसाखरेचा असा नव्हे.. संत्र्याचा संजीवनी बॉबी संत्रा देशीकडक, तोंड वाकडं करायला लावणारा.. .

रामचंद्र्या चहा न घेता बँकेत गेला तर हातच थरथरायचा लिहायला त्याचा अन म्हणून शावड्या त्याला देवदुता सारखा वाटायचा म्हणून तर मालक म्हणायचा तो त्याला.

त्याचं हे आरडणं ऐकून आजोबा गरजले.

शावड्या दे एक क्वार्टर वत त्याच्या नर्ड्यात, अन हा हिशेब बी सांग दोन महीने झाले म्हणा.

शावड्याने पेला पाणी अन क्वार्टर दिली व हिशेबाची वही बगत म्हणला,

मामा दोन हजार तिनशे चाळीस झाले.. ..

मालक पगार व्हईन आजउद्या. . रामचंद्र्या म्हणला.

रामचंद्र्या गेला, शावड्यानेही द्फ्तर घेतलं अन शाळेला निघणार तोच म्हतारं खणकलं.. .

शावड्या दोन काटरी टाकून ने पिशीत. मास्तड्याचा निरुप आलता.. .

आण्णा मास्तर. दोघांसाठी दोन घेवून शाळेत या कानाचं त्या कानाला कळु न देता. शावड्यानं पार्सल मास्तरांना दिलं, अन वर्गात गेला.. .

चार वाजता डुलक्या घेत नशेत रामचंद्र्या पुन्हा कडमडला, मालक एक घ्या

शावड्याने ग्लास पाणी दिलं अन बाटली आणायला मागच्या खोलीत गेला पटापटा बाटली घेतली दाम्हण घेतला सिल तुटु न देता झाकण खोललं आर्धी बाटली रिकाम्या बाटलीत वतली पाणी घालुन बाटली भरली सील लावलं. अन कडक बाटलीत बोट बुडून आला. ..

बाटलीचं सील कडकडून बोट बूडवून काडी लावली बोटाला भपकन बोट पेटलं. .. . रामचंद्र्या खुष झाला कडक दारु बघून

हो आता तुम्ही म्हणाल शावड्या खोटेपणा करायचा रामचंद्र्या सोबत. .. हो मान्य आहे.. पण त्याला नाईलाज व्हता. हा रामचंद्र्या चार चार बाटल्या वढुन घरी जायचा अन बायकोला बदडायचा. त्या माउलीला मार मिळु द्यायचा नसेल तर ह्याला चढुन देणे गरजेचे असे.. . अन म्हणून शावड्या खोटे पणा करीत असे.. .. शावड्याची चुकभुल क्षमस्व.. .. .

# शँपु

शनिवारचा दिवस.

हाफ डेची शाळा म्हणून शावड्या भरभर चालत होता, डोक्यावर वीस पंचवीस किलोची गवताची मोळी वजा लांबसडक पेंढी होती, आज्जीनं बांधुन दिली होती. कुभांड्याच्या बरडा वरून, आज्जीचं वझं झालं नव्हतं म्हणून आज्जी बोलली.. .. हे पाह्य शावड्या भाऊ पेंडीभर गवत झालं. पेंढी बांधुन देते. तु पुढं जाय. मी येते मागुन, लवकर जाय. पाय उचलून. शाळा भरन तुही.. .

बरड गावापासून किलोमीटर भर लांब होतं कापुस अन मक्याचे पीकं भरभरून वाढलेली होती. शावड्या एकटाच चाललेला सकाळचे सात साडेसात झालेले, पायवाटेवर चिटपाखरूही नव्हतं, पायवाटेवर विस्तीर्ण बोरींची काळी शार सावली पसरलेली होती.. . आवाऱ्याच्या वावरात दोन कुत्रे खडाजंगी भांडत होते.. शावड्याचे पाय लटलटत होते. तो चिडी चिप चालला होता, तेवढ्यात जवारीत बसलेली हरणी ताडकन उठून पळाली, शावड्याचा तर जीवच गेला भितीने.. . पण देव पावला पुढं माळ्याचं शेळ्या वळणारं बुढ्ढं भेटलं, बोरीचा पाला आणायला आलं होतं बरडावर.

शावड्या उगंच बोलला त्याच्याशी. अन तो दिसेनासा व्हायच्या आत खंडोबाचं रस्त्यावरलं देऊळ गाठलं, मोठा उसासा टाकीत पेंढी टेकडीला टेकवली. मान पाठ झटकली. अन पेंढीला डोकं लावलं अन पटापट जात पेंढी दगडी ओट्यावर फेकली.. .. ..

तो पर्यंत घंटा वाजली होती, शावड्याने पाय धुतले अन दफ्तर घेवून पळाला.

वर्गात तेल्याचा आन्या शावाड्याच्या मागेच बसला होता, शावाड्याच्या डोक्यातली माती बघुन म्हणला…

शावड्या डोक्यात माती झाली कुंटल भर

घरी जावून शँपु लाव जरा.. .

शँपु नाव ऐकलेलं पण लावलेला नाही कधी, लावायचा कसा तेबी माहीत नव्हतं, आन्याला ईचारावं म्हणलं पण ईचार केला त्यात काय एवढं तेला सारखा चोपडायचा आसन.. .

शावड्यानं मधल्या सुट्टीत घर गाठलं. आज्जीकडून आठाणे घेतले. बेपाऱ्याच्या दुकानातून शँपु घेतला, गुळगुळीत पुडी आरशासमोर उभं राहून दाताने फोडली. तळहातावर निळसर शँपु घेतला. अन चोपडला अन खुशीत वर्गात पोचला.. .

वर्गात सगळे पोट्टे एकमेकाच्या डोक्याचा वास घेत घेत शावड्याजवळ आली. नकट्या पोरी तर खुसखुसून हासत होत्या..

तेवढ्यात निकम सर वर्गात आले, गलका थांबला वर्गात घमघमणारा वास निकमसरांना पण शावड्याजवळ घेवून आला, चिपचिप्या केसात हात घालुन गरजले.. .. पाणी नव्हतं का शावड्या डोकं धुवायला.. ..

शावड्याची ट्युब पेटली पाण्याने धुवायचं पण होतं.. .

तेवढ्यात बेल वाजली अन चपट्या नाकाच्या पोरी अन भसाड्या गळ्याचे पोरं शावड्याकडं पाहून हासत पळत होते पण शावड्या मात्र खुष होता कारण आज तो शँपु लावायला शिकला होता.. .. .. ..

# पी. एस. आय. ची रेड.. .. .

भाऊ ओ भाऊ.. ..

धावत पळत मामा ओसरीत हजर झाला.

काय रं पोरा काय झालं आरडायला.

भाऊ खबर मिळलीय का रखम्यानं कम्प्लेंट केली. अन पी. एस. आय आलाय स्वतः त्याच्या घरी. विचारपुस करु रायले ते ईकडं. येतीनच एवढ्यात.. ..

बरं येऊ दे. च्यामारी काय लय माल नाही. हे घरात तीन चार काटरा आसन. .

पण भाऊ सापडल्या मंग

तु काय काळजी नको करु बैस वाड्यात निवांत

मामा गेला अन बाबा खणकले.. .. शावड्या ए शावड्या

काय बाबा.. ते लायसन आणून ठेव माह्याकडं.. .

आन ए कड्डा माल कितीक हे शिल्लक

पाच काटरी हे बाबा. . शावड्या उत्तरला

काय? पाच च्यायला लायसन तर दोनचच हे शावड्या आपल्याकडं

तेवढ्यात दारात गाडी थांबली अन दोन पोलीस एक लेडी पोलीस अन पी. एस. आय साहेब घरात दाखल झाले.. .

बाबा ओसरीत बसलेले. . या या साहेब कसंकाय येणं केलं गरीबाकडं

गरीबाकडं काय म्हताऱ्या! दारु विकतो अन स्वतःला गरीब म्हणतो काय रं.. .. पी. एस. आय गरजला..

नाही. नाही साहेब काही तरी गलतफहमी झाली वाटतं.

गलतफहमी? पक्की खबर आहे. खरं काय ते सांग. नाही तर... घ्या रे झडती घराची.. .. .

तसे मामाला, बाबाला, आज्जीला ओसरीत बसवलं, मामी भाकरी करीत होती तीच्याजवळ ती लेडी पोलीस बसवली अन दोघे पोलीस घर शोधु लागले.. ..

शावड्याकडं मात्र कोणाचच लक्ष नव्हतं तो तिथच मधल्या खोलीत उभा होता.

मामा अन बाबा लटलट कापत बसले होते.

पोलीस मागे वाड्यात गेले तपासायला तेवढ्यात शावड्याने पाचही काटरा चड्डीत कंबरेला खोचल्या अन त्यावर करदोडा चढवला.. ..

मधल्या दारात येवून बाबाला डोळा मारला, तसा म्हताऱ्याच्या जीवात जीव आला अन मग काय म्हतारा ऐटीत बसून राहीला.. .

ईकडं शावड्याने मामीला वाढुन मागितलं. तीनं मेथीची भाजी अन बाजरीची ताजी भाकर वाढली अन शावड्या चुपचाप जेवु लागला.. ..

सुमारे तासभर झगडून पोलीस मामा थकले अन साहेबाला म्हणले..

नाही साहेब काही नाही य घरात

तसा साहेब चिडला अन म्हणला नीट पाहीलं का?

हो साहेब कोपरे कापरे सारे शोधले

साहेब म्हणला आज जातोय पण कधी सापडलं तर याद राखा साल्याहो.. .

गाडी गेली तसा मामा उठला अन मधल्या खोलीतलं फडतळ उघडून म्हणला..

भाऊ पाच काटर होत्या. .. कुत्र्यायला नाही सापडले मग गेल्या कुडं

तसा बाबा म्हणला. . शावड्या आण कुडं ठेवल्या रे बाटल्या

शावड्याने हात धूतला अन कण्हत उठला व कंबरेच्या चार काटरा काढुन देत रडु लागला

मामा जवळ येवून म्हणला

ए पोरा रडतो काय तुह्या मुळेच तर वाचलो सगळे मग रडतो कशाला..

मामा ती पाचवी आर्धी बाटली खोसताच येईना

मग कुठंय ती सापडली तर नाही ना त्यानला.. .

नाही नाही शावड्या उत्तरला

आरं कड्डा मग कुडंय ती ते तर सांग..

शावड्याने रडता रडता सदरा वर केला अन म्हणला पोटात.. .

काय? मामा अन बाबा एकदम ओरडले

हा. तो पोलीस मामा यायला लागला मग घेतली पेवून अन बाटली दिली ठेवून जात्यामागं

हा तरीच मी म्हणते शावड्या तासभर जेवला कसा तीन भाकरी खाल्ल्या मामांजी याने आज मामी हळुच बोलली.. .

तसा शावड्याला जवळ घेत बाबा बोलला.. लाज राखली कड्डा आज, चाल आज बिनपाण्याची घेतली तरी माफ.. .. पाठ थोपडत मामा म्हणला शाब्बास रे वाघा.. ..

शावड्या मात्र गुंगीत केव्हा झोपला कळलही नाही.. .. ..

# शावड्या बनला शिक्षक.. .. .

शावडया आता आठवीला गेला होता अन आजोबांच गरजणं थांबल होतं, देवानं त्यांच प्रमोशन केलं होतं, बाबा आता देवाघरी गेले होते राहायला.. ..

ईकडे मात्र बाबा गेल्यापासून घराला उतरती कळा लागली होती, वातावरण पुर्णच बदललं होतं वारंवार धाडी पडल्याने धंदा बंद पडला होता.. . घरात मामीचं वर्चस्व वाढलं होतं.. .. . शावड्याचीही त्याच्या घरी पाठवणी झाली होती..

शावड्या पहिल्यांदाच आईच्या घरी आला होता.. . तिथल्या लोकांना व शावड्यालाही ते लोक एखाद्या एलियन सारखेच वाटत होते.

शावड्याला शाळेत पाठवायचं ठरलं. पण शाळा सात किलोमीटर लांब होती.. . सारे पोरं सायकलवर जायचे. आईनं पदरमोड करुन तेराशे रुपयात एक ॲटलास सायकल आणली.. ..

आई म्हणली घ्या अन जाणीव ठेवून अभ्यास करा..

सायकल आली पण चालवायची कोणी.. . आजोंबानी कधी सायकल ला कधी हातबी लावु दिला नव्हता पण घरच्यांना कसं सांगायच की मला सायकल येत नाही म्हणून.. .

लहान्या भावानं नव्या सायकल ची दिवसभर मज्जा मारली. .. तो घरी येताना दिसला अन त्याला आश्रमाच्या टेकडीवर थांबवलं अन त्याला खरी सायकल न येण्याची अडचण सांगितली.. .

ते खुळं पोटभर हासलं अन म्हणलं.. .

बैस सिटावर सोप्प हे मी कॅरेज धरतो पडणार नाही तु

पाह्य अं बेट्या पडलो तर लय मार खाशीन

बैस तर खर फट्टुस

शावड्या बसला हँडल धरलं दोन्ही पाय पँडलवर ठेवले अन म्हणला हळुहळु लोट रे धरून ठेव रे बाबा..

लहानं लय आचपळ त्याने टेकडीवरुन दिलं ढकलुन अन पोट धरुन हासु लागलं.. ईकडं शावड्याची तारांबळ उडाली तोल सांभाळता सांभाळता पडलं नाल्यात जावून. .. लहानं धाकामारी पळालं घरी.. .

शावड्या मात्र फुटक्या गुडघ्यानी उठला सायकल लोटत टेकडीवर नेली बसला. .. . सांज होस्तोर तेच अन अंधार पडता पडता आला घरी सिटावर बसून.. . शिकला सायकल एकदाचा.. .. .. .

दुसऱ्या दिवशी लहाना खटला-- मी डबलशीट जाणार नाही मला पण नवी सायकल घ्या नासतर शाळा सुटली माही.. .

सायकल घ्यायची ऐपत नव्हती मग ती लहान्याला दिली अन शावड्याने सुरु केली पायी वारी.. सकाळी सातलाच भरायची शाळा. . शावड्या पावणे सहाला निघायचा अन बरोबर परीपाठाला हजर व्हायचा. .. . लहान्या आळशाची सायकल परीपाठानंतरच यायची. .. मास्तर शावड्यालाच बोलायचे.. ..

नववी ते बारावी हाच नित्यक्रम शावड्याचा.. ..

बारावीला तिसरा आला  एक आणि दोन नंबर आलेल्या गावातल्या दोन्ही पोरींनी डी. एड. चा फॉर्म भरला शावड्यानेही भरला. . योगायोगाने नंबरही लागला.. घरच्यांनी कर्ज काढुन फीसचा डी. डी. भरला.. .

हाताने स्वयंपाक बनवता बनवता दोन वर्ष निघुन गेले अन दोन्ही वर्ष पहिल्या नंबरने शावड्या पास झाला.

खर्च लागु नये म्हणून गावातच ईंटर्नशिप केली. . सी. ई. टी दिली. ना मार्गदर्शन ना कोचींग. एक मार्क कमी पडला. सारी स्वप्न धुळीत मिळाली. . सोबतच्या दोन्ही पोरी जॉईन झाल्या होत्या.. मग काय नजराच बदलल्या सगळ्यांच्या शावड्याला बघायच्या..

शावड्या मात्र सर्वांना झेलत रेटत होता. क्लास घेवून पाच सहा हजार कमवायचा. अन फिस भरत शिकायचा. कोर्टात केस चालु होती. रीचेकची, निकाल लागला अन शावड्याचे मार्क वाढले. अन त्याला जळगाव जिल्हा मिळाला.

या दरम्यान घरच्यांनी लग्न करुन दिलेलं, एक मुलगीही झालेली होती.

अचानक एक दिवस पोस्टमन आला मळ्यात, जुलै महीना पाऊस पडलेला होता अन शावड्या कपाशी टोचत होता वावरात, पोस्टमननं आवाज दिला, चिखलाने माखलेला शावड्या आला सही केली पत्र घेतलं पत्ता वाचला, मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. जळगाव..

आधाशासारखं पत्र वाचलं कागदपत्र तपासणीसाठी बोलावलं होतं सगळ्यांना सांगितलं आनंदाच्या भरात सगळ्यांनी काम बंद केलं, शावड्या ला निरोप द्यायला सगळे जमले लेक ईतक्या लांब एकटा चाल्ला म्हणून आईच्या डोळ्यात पाणी येत होतं.

शावड्या पाया पडला अन गेला तसाच शाळेला हजर झाला अन रुपया क्वाईन बॉक्सला टाकीत शाळा चांगली हे म्हणला.. ..

अन आजही तो तिथंच आदिवासी मुलांचा व त्यांच्या पालकांचा आवडता मास्तर आहे.. ..



## ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

किंवाesahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईल मध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य